**शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अटी व शर्ती आणि नियुक्तीची कार्यपध्दती याबाबतच्या धोरणामध्ये सुधारणा.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्या.१२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १६ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही- २०११/ प्र.क्र.१३७/कार्यासन १२, दि.१७/१२/२०१६.
२) शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही- २०१६/प्र.क्र.५१०/ कार्यासन १२ , दि.२७/१२/२०१६.

**<u>प्रस्तावना</u> :-**

संदर्भ क्र. १ वरील दि.१७/१२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अटी व शर्ती आणि नियुक्तीच्या कार्यपध्दती याबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. प्रतिनियुक्तीचे धोरण प्रथमत:च विहित करण्यात येत असल्यामुळे धोरणाच्या अंमलबजावणीसंदर्भात येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार शासनास शिफारस करण्याकरीता मा. मंत्री, महसूल यांच्या अधक्षतेखाली एक मंत्रिमंडळ उपसमिती, संदर्भ क्र. २ वरील दि.२७/१२/२०१६ च्या शासन निर्णयाद्वारे गठीत करण्यात आली होती. सदरहू समितीने प्रतिनियुक्तीच्या धोरणामध्ये येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी काही शिफारशी केल्या असून त्या शिफारशींच्या अनुषंगाने दि.२७/१२/२०१६ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार मा. मंत्री, महसूल यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या शिफारशीनुसार संदर्भ क्र. १ वरील दि. १७/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीमध्ये या शासन निर्णयान्वये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :-

**१) <u>दि. १७/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील परि. ५ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे</u> :-**

**क) परि. क्र. ५ (अ) (३) पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे :-**

परि.क्र.५ (अ) (३) :- प्रतिनियुक्ती प्रथमत: ३ वर्षासाठी देण्यात यावी व संबंधित अधिकाऱ्याची इच्छुकता व संवर्ग नियंत्रण विभागाचे सहमतीने हा कालावधी चौथ्या वर्षाकरिता वाढविण्यात यावा. परंतु चार वर्षांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर आणखी एक वर्षासाठी म्हणजेच ५ व्या वर्षासाठी मुदतवाढ द्यावयाची झाल्यास मा.मुख्यमंत्री यांची विनिर्दिष्टपणे मान्यता घेण्यात यावी. ५ वर्षांचा कालावधी संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

**ख) परि.क्र. ५ (अ) (४) पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे :-**

राज्य शासनाकडील/ राज्य शासनाची महामंडळे इत्यादि मधील व केंद्र शासनातील कार्यालयातील/ केंद्र शासनाच्या महामंडळातील/ कंपन्यामधील पदांवर, समतुल्य वेतनश्रेणी मधील समान वेतनबँड व ग्रेड पे च्या पदावरच या मार्गाने नियुक्ती देता येईल. समतुल्य वेतनश्रेणी मधील समान वेतनबँड व ग्रेड पे च्या पदावरील अधिकारी / कर्मचारी प्रतिनियुक्तीवर जाण्यासाठी उपलब्ध न झाल्यास, अशा अपवादात्मक परिस्थितीत, अशा समकक्ष पदांच्या निम्न संवर्गातील पंरतु पदोन्नतीसाठी आवश्यक असलेल्या अटी व शर्ती पूर्ण केलेल्या व प्रतिनियुक्तीने जाण्यास इच्छुक असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्याची प्रतिनियुक्तीच्या पदावर निवड झाल्यास अशा अधिकारी / कर्मचाऱ्यास प्रतिनियुक्तीच्या पदावर लागू असलेल्या वेतनश्रेणी व वेतन अनुज्ञेय करण्याबाबत वित्त विभागाच्या सहमतीने निर्णय घ्यावा.

**ग) परि. क्र. ५ (अ) (६) मधील तरतूद रद्द करून पुढीलप्रमाणे नवीन तरतूद अंतर्भूत करण्यात येत आहे:-**

१) विशिष्ट संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा प्रतिनियुक्तीनेच घेणे आवश्यक असल्याने अशी पदे अन्य प्रशासकीय विभागाच्या आस्थापनेवर निर्माण केलेली असतील (ज्या पदाचे वेतन राज्य शासनाच्या एकत्रित निधीतून दिले जात असेल अशा प्रकरणी) किंवा अशी पदे राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील मंडळे, महामंडळे, कंपन्या, सार्वजनिक उपक्रम तसेच स्वायत्त संस्था यांच्या आस्थापनेवर निर्माण केलेली असतील (ज्या पदांचे वेतन राज्य शासनाच्या एकत्रित निधीतून दिले जात नाही) तर अशा पदांना प्रतिनियुक्ती धोरण लागू होणार नाही व बदली अधिनियमातील तरतूदीनुसार अशा पदांवर नियुक्ती देण्याची कार्यवाही संबंधित संवर्ग नियंत्रण विभागामार्फत करण्यात यावी.

२) राज्य शासनाच्या अधिपत्याखालील महामंडळे /कंपन्या/ सार्वजनिक उपक्रम तसेच स्वायत्त संस्थेकडील जी पदे शासनाच्या सेवेतून कोणत्याही विशिष्ट संवर्गासाठी उपलब्ध नसलेल्या व ज्या पदावर समकक्ष वेतनश्रेणीतील कोणत्याही संवर्गातील अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने भरले जाण्यासाठी उपलब्ध असतील अशाच पदांवरील प्रतिनियुक्तीने केल्या जाणाऱ्या नियुक्त्यांना प्रतिनियुक्ती धोरणातील अटी व शर्ती व त्यासाठी विहित केलेली नियुक्तीची कार्यपध्दती लागू राहील.

**घ) परि. क्र. ५ (ब) (२) पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे :-**

प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी इच्छुकता दिलेला अधिकारी/ कर्मचारी ज्या संवर्गात कार्यरत आहे त्या संवर्गातील मंजूर पदसंख्येपैकी १५ टक्के पेक्षा अधिक पदे रिक्त असल्यास, त्या अधिकारी / कर्मचाऱ्यास प्रतिनियुक्तीवर पाठविता येणार नाही. रिक्त पदे भरण्यास शासनाचे निर्बंध असल्यास,

अशा प्रकरणी १५ टक्के पेक्षा जास्त पदे रिक्त राहत असल्यास, त्या संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्तीवर पाठविण्याबाबत संबंधित संवर्गनिहाय प्रशासकीय विभागाने प्रकरणपरत्वे निर्णय घ्यावा.

**च) परि. क्र. ५ (ब) (५) पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे :-**

प्रतिनियुक्तीने नियुक्ती करताना गट-अ मधील अधिकाऱ्यास त्याच्या मूळ जिल्ह्यात व गट-ब (राजपत्रित) अधिकाऱ्यास त्याच्या मूळ तालुक्यात शक्यतोवर प्रतिनियुक्तीने पाठवू नये. मात्र प्रतिनियुक्तीच्या निवड प्रक्रियेची पहिली फेरी पूर्ण केल्यानंतर अन्य कोणताही अधिकारी उपलब्ध न झाल्यास स्व:जिल्हा किंवा स्व:तालुका यांच्यामध्ये प्रतिनियुक्ती अनुज्ञेय करण्याबाबत प्रकरणपरत्वे निर्णय घेण्यात यावा.

**छ) परि. क्र. ५ (ब) (६) मध्ये पुढील परंतुक अंतर्भुत करण्यात येत आहे :-**

"परंतु प्रतिनियुक्ती धोरणातील प्रतिनियुक्तीची कमाल १० वर्षांची अट व सेवानिवृत्तीस २ वर्ष शिल्लक असताना प्रतिनियुक्ती अनुज्ञेय नसल्याची अट मुख्यमंत्री सचिवालयातील व मंत्री आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना लागू असणार नाही."

**ज) परि. ५ (ब) (११) मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-**

प्रतिनियुक्तीवरून मूळ प्रशासकीय विभागात / कार्यालयात सेवा प्रत्यावर्तित झाल्यावर मूळ विभागात मूळ संवर्गात किमान ३ वर्षे कालावधी ( Cooling Off) पूर्ण करणे आवश्यक राहील. याप्रमाणे किमान ३ वर्षे कालावधी पूर्ण केल्याशिवाय संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यास पुन्हा प्रतिनियुक्ती देण्यात येणार नाही.

परंतु, मुख्यमंत्री सचिवालयातील व मंत्री आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचाऱ्यांना cooling off कालावधी पूर्ण करण्याच्या अटीतून वगळण्यात येत आहे.

**झ) परि. क्र. ५ (क) (२) पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे :-**

दि. ०१/११/२०१४ पूर्वी १० वर्षांच्या कालावधीत ज्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी मंत्री आस्थापनेवर खाजगी सचिव / विशेष कार्य अधिकारी व स्वीय सहाय्यक म्हणून काम केले असेल, असे शासकीय अधिकारी / कर्मचारी पुढील ५ वर्षे मंत्री आस्थापनेवर खाजगी सचिव / विशेष कार्य अधिकारी व स्वीय सहाय्यक म्हणून प्रतिनियुक्तीने काम करता येणार नाही.

**ट) परि. क्र. ५ (क) (३) पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे :-**

दि. ०१/११/२०१४ नंतर मंत्री आस्थापनेवर खाजगी सचिव / विशेष कार्य अधिकारी व स्वीय सहाय्यक म्हणून प्रतिनियुक्तीने कार्यरत राहून किमान १ वर्षापेक्षा अधिक कालावधी पूर्ण केल्यानंतर कार्यमुक्त झालेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी ५ वर्षे (cooling off) कालावधी पूर्ण

केल्याशिवाय ते पुन्हा मंत्री आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने नियुक्तीस पात्र असणार नाहीत. मात्र मुख्यमंत्री सचिवालयातील जमादार व मंत्री आस्थापनेवरील चोपदार या पदांना प्रतिनियुक्ती धोरणातून सूट देण्यात येत असून प्रचलित कार्यपध्दतीप्रमाणे ही पदे भरण्यात यावीत.

**ठ) परि. क्र. ५ (ड) (१) पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे :-**

प्रतिनियुक्तीवर पदस्थापनेसाठी पदग्रहण अवधी वित्त विभागाने यासंदर्भात वेळोवेळी केलेल्या नियमानुसार अनुज्ञेय राहील. संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रतिनिुयक्तीच्या आदेशात, प्रतिनियुक्तीचा कालावधी सुरू होण्याचा व संपुष्टात येण्याचा दिनांक स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक राहील.

परंतु, मंत्री आस्थापनेवरील अधिकारी /कर्मचाऱ्यांना पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही.

**ड) परि. क्र. ५ (ड) (५) पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे :-**

प्रतिनियुक्तीवर सेवा घेणाऱ्या कार्यालयास काही विशिष्ट कारणास्तव विहित कालावधी संपण्यापूर्वी प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकाऱ्यास त्याच्या मूळ प्रशासकीय विभागास / कार्यालयाकडे परत पाठवणे आवश्यक असल्यास , त्या आस्थापनेवरील सक्षम प्राधिकाऱ्याने तसे समर्थनीय कारण स्पष्ट करून त्याला / तिला परत पाठवण्यासाठी यथास्थिती संबंधित प्रशासकीय विभागास / कार्यालयास तीन महिन्यांची पूर्वसूचना (नोटीस) देणे आवश्यक राहील. तथापि, या संदर्भात विशिष्ट कारणे नमूद करून उदा. अनियमितता, अफरातफर, कर्तव्यच्युती, इत्यादी कारणे नमूद करून प्रतिनियुक्तीचा कालावधी तात्काळ संपुष्टात आणता येईल.

परंतु, मंत्री आस्थापनेवरील कर्मचाऱ्यास मूळ संवर्गात प्रत्यावर्तित करताना ३ महिन्यांची पूर्वसूचना देण्याची आवश्यकता नाही.

**ढ) परि. क्र. ५ (ड) (६) पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे :-**

आदेशात विहित केलेला प्रतिनियुक्तीचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच अधिकारी/ कर्मचारी स्वत:हून मूळ प्रशासकीय विभागात/ कार्यालयात परत जाण्यास इच्छुक असल्यास त्याने समर्थनीय कारण स्पष्ट करून त्यासाठी किमान तीन महिन्यांची पूर्वसूचना ( नोटीस ) यथास्थिती दोन्ही प्रशासकीय विभागास/ कार्यालयास देणे आवश्यक राहील. अशा परिस्थितीत त्याच्या विनंतीवरून प्रतिनियुक्ती संपुष्टात आणण्याचा निर्णय प्रतिनियुक्तीच्या आस्थापनेवरील कार्यालयातील सक्षम प्राधिकाऱ्याने घेतल्यास, सदर कर्मचाऱ्याच्या पूर्ण सेवाकाळात अनुज्ञेय एकूण १० वर्षाच्या प्रतिनियुक्ती कालावधीतून आदेशात विहित केलेला प्रतिनियुक्तीचा कालावधी त्याने उपभोगल्याचे समजण्यात येईल.

याशिवाय प्रतिनियुक्तीची निवड प्रक्रिया पूर्ण होऊन प्रतिनियुक्तीसाठी संबंधित अधिकाऱ्याची निवड झाल्यानंतर अशा अधिकाऱ्याने प्रतिनियुक्तीसाठी दिलेली आपली इच्छुकता मागे घेतली किंवा संवर्ग नियंत्रण विभागाने त्यांना कार्यमुक्त करण्यास नकार दिल्यास अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांना पुढील ३ वर्षांकरीता प्रतिनियुक्तीवर जाता येणार नाही. परंतु अंतिम निवड होण्यापूर्वी आपली इच्छुकता मागे घेतली किंवा संवर्ग नियंत्रण विभागाने त्यांची सहमती मागे घेतली तर वरील बाब त्याप्रकरणी लागू होणार नाही.

**त) परि. क्र. ५ (ड) (७) मधील तरतूद रद्द करण्यात येत आहे.**

**थ) परि. क्र. ५ (ड) (८) पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे :-**

वरील अटी व शर्तीपैकी अट क्र. ४ मुख्यमंत्री सचिवालय व मंत्री आस्थापनेवरील प्रतिनियुक्तीने काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना लागू राहणार नाहीत.

प्रतिनियुक्ती धोरणासंदर्भातील शासन आदेश निर्गमित करण्यापूर्वी मंत्री आस्थापनेवर जे अधिकारी/कर्मचारी प्रत्यक्षात हजर झाले आहेत, मात्र त्यांचे प्रतिनियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत, अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांचे आदेश प्रतिनियुक्तीचे धोरण अस्तित्वात येण्यापूर्वी लागू असलेल्या अटी व शर्ती विचारात घेऊन निर्गमित करण्यात यावेत.

**थ) परि. क्र. ५ (इ) (१) पुढीलप्रमाणे नव्याने अंतर्भुत करण्यात येत आहे :-**

प्रशासकीय प्रशिक्षण संस्थामधील केवळ अध्यापकीय संवर्गातील पदांवर (Teaching Faculty) प्रतिनियुक्तीने नियुक्ती करताना किंवा प्रतिनियुक्तीने सध्या कार्यरत असणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बाबतीत प्रतिनियुक्ती धोरणातील अटी व शर्ती लागू केल्यामुळे येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन, खालील प्रकरणात शासन निर्णयातील अटी शिथील करण्याचा प्रस्ताव अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग व प्रधान सचिव ( व्यय ), वित्त विभाग यांच्या वरिष्ठ सचिव समितीपुढे सादर करून समितीने प्रकरणनिहाय नियुक्तीनुसार अटी शिथील करण्याबाबत निर्णय घ्यावा.

**शिथील करावयाच्या अटी :-**

अ) ज्यांची प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेतील अध्यापकीय पदावर १० वर्षांपेक्षा जास्त कालावधीसाठी प्रतिनियुक्तीची सेवा झालेली आहे,

आ) ज्यांची प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेतील अध्यापकीय पदांवर प्रतिनियुक्तीवर सलग ५ वर्षांपेक्षा जास्त सेवा झालेली आहे, अशा संस्थेतील अध्यापकीय पदांवर प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या तसेच ज्या अधिकाऱ्यांचा, सेवानिवृत्तीसाठी २ वर्षांपेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे,

इ) अशा प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेमध्ये अध्यापकीय पदावर जाण्यास इच्छुक असलेल्या अधिकाऱ्यांच्या मूळ संवर्गात १० टक्क्यांपेक्षा जास्त पदे रिक्त असल्यास त्यांना अध्यापकीय पदावर प्रतिनियुक्ती देण्यासाठीचे प्रस्ताव,

ई) प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेतील अध्यापकीय पदांवर जाण्यासाठी कर्मचाऱ्यांना cooling off कालावधीमध्ये शिथिलता देण्याचे प्रस्ताव.

२. सर्व प्रशासकीय विभाग व विभागप्रमुख यांनी प्रतिनियुक्तीने नियुक्ती देताना वरील आदेशाचे काटेकोरपणे पालन होईल, याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२१७१६१९२४५६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Geeta Rahul Kulkarni

Digitally signed by Geeta Rahul Kulkarni
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87e2e317e0d978442ac6b599d6a0abcf73fe717ee52994443a8509075101cc93, serialNumber=92d474843b842720200d1a10946d5fc9348b9450f867605a47d177207c9bd384, cn=Geeta Rahul Kulkarni
Date: 2018.02.17 16:24:04 +05'30'

**( गीता कुलकर्णी )**
**उप सचिव (सेवा ), महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
५. सर्व मा.संसद सदस्य, /मा. विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा. मुख्य सचिव,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना), त्यांनी हे आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.
९. *प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१०.*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
११.* प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१२.*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१३.*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
१४.*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद) मुंबई,
१५.*राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,

१६.*सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१७.*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई.
१८. *महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई,
१९.*महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर,
२०.*महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, नागपूर,
२१.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई (प्रसिध्दीकरिता ५ प्रती)
२२.ग्रंथपाल , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१० प्रती)
२३.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२४.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२५.मुख्य लेखापरीक्षक (निवासी लेखे), कोंकण भवन, नवी मुंबई,
२६.सर्व विभागीय आयुक्त
२७.सर्व जिल्हाधिकारी
२८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२९.सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख,
३०.*सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची मान्यता प्राप्त संघटना, (कार्यासन -१६ अ, सामान्य प्रशासन विभागामार्फत)
३१.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३२.निवड नस्ती.
(*-पत्राद्वारे)